महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/अर्ज-निवेदने/२०२४/ 3226 दिनांक : 06 AUG 2024

**परिपत्रक :-**

विषय : अर्ज / निवेदने विहीत चाकोरीतूनच सादर करणेबाबत...

संदर्भ : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक १२/आस्था(१)/सुनिता पाटील/२०२४/DTEM-D120EST3/137/2024-DESK12, 1/504532/2024, दिनांक ०१/०८/२०२४.

निम्नस्वाक्षरीकारांच्या असे निदर्शनास आले आहे की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्वशासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालयातील बहूतेक कर्मचारी हे त्यांचे अर्ज / निवेदने इत्यादी विहीत चाकोरीचे पालन न करता थेट संचालनालयास / या कार्यालयास सादर करतात., याबाबत संबंधित संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुखांचे अभिप्राय व प्रकरणाची सद्यःस्थिती विचारात घेण्याकरिता या कार्यालयामार्फत नाहक पत्रव्यवहार केला जातो.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कर्मचा-यांनी वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करताना संस्था प्रमुख - प्रादेशिक कार्यालये तथा सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय - विभाग प्रमुख तथा संचालक, तंत्र शिक्षण या क्रमाने पत्रव्यवहाराची चाकोरी निर्धारित आहे.

तरी आपल्या संस्थेतील / कार्यालयातील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज / निवेदने विहीत चाकोरीतूनच, म्हणजे आपले संस्था प्रमुख, त्यानंतर हे कार्यालय व त्यानंतर संचालनालय अशा चाकोरीने कार्यवाही करणे, अन्यथा त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घेणेबाबत त्यांना सूचित करावे.

तसेच यापुढे अशा प्रकारचे अर्ज / निवेदने संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांमार्फत व त्यांच्या अभिप्रायासह व सद्यःस्थितीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच कर्मचा-याच्या अर्जाची / निवेदनाची दखल घेतली जाईल, अन्यथा सदरचे अर्ज / निवेदन या कार्यालयात दफ्तरी दाखल करण्यात येईल., याची नोंद घ्यावी.

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्वशासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालयांनी सदर परिपत्रकातील निर्देश व मार्गदर्शक सूचनांनुसार उचित कार्यवाही करुन, सदरचे परिपत्रक आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. द. व्यं. जाधव),
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्राचार्य / संचालक / उपसचिव,
पुणे विभागातील कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालय.

(२) या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

D:\my documents\Circular.doc\16